# डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी नागपूर

NAME OF THE PROGRAMME : समभाव फिल्म फेस्टिवल
ORGANISED BY : राज्यशास्त्र विभाग, इंग्रजी विभाग व मावा
(मेन्स अगेन्स्ट व्हॉयलेन्स अँन्ड अँब्युज,मुंबई)
DATE OF PROGRAMME : दिनांक २२/२/२०१२४
NUMBER OF PARTICIPANTS : 86




**अहवाल**

दिनांक २२/२/२०१२४ रोजी राज्यशास्त्र विभाग, इंग्रजी विभाग व मावा (मेन्स अगेन्स्ट व्हॉयलेन्स अँन्ड अँब्युज, मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय समभाव फिल्म फेस्टिवल (चित्रपट महोत्सव) चे आयोजन करण्यात आले. महोत्सवातर्गत दाखविण्यात आलेले चित्रपट लिंगसमभाव आशय आधारित होते. मावा संस्थेचे प्रकल्प समन्वयक श्री. प्रवीण थोटे यांनी सुरवातीला लिंगभेद, लिंगसमभाव, स्त्री आणि पुरुषांबद्दल समाजात प्रचलित असलेले समज, गैरसमज, दोघांसाठी असलेले सामाजिक आचरणाचे नियम. लिंगभेद आधारित वर्तन, वागणूक, व्यवहार, स्वभाव, आचरण, प्रथा, इत्यादी बद्दल सविस्तरपणे माहिती दिली. व विद्यार्थ्यांना बोलते केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात, 'नटखट', 'संडे', 'द लिटील गॉडसेस', 'द ग्रेट इंडियन किचन' इत्यादी चित्रपट दाखविले. चित्रपट बघून झाल्यावर चर्चा घेण्यात आली. प्रथम 'ज्यूस' या चित्रपटावर चर्चा झाली. चित्रपटावर भाष्य करण्यासाठी उपस्थित असलेल्या मा. सुगंधा खांडेकर, (All India Dalit Adhikar Manch च्या महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्ष, व सामजिक कार्यकर्त्या), मा. संगीता चव्हाण (महिला बचत गट, नागपूर शाखा अध्यक्ष, दि. नागपूर क्रेडीट को- ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्त्या) तसेच मा. अनिता थोरात (सामाजिक कार्यकर्त्या) यांनी या चित्रपटातील विविध पैलूंवर भाष्य केले.

चित्रपटातील लिंगभेद, स्त्री पुरुष समानता व नातेसंबंध, मर्दानगी, लैगिकता, कामाचे विभाजन, पुरुषांचे घरात असलेले स्थान त्यांनी चालविलेल्या राजकीय चर्चा, चित्रपटाची कथा, यामधील सत्तास्थाने, स्त्रियांची कौटुंबिक जबाबदारी, स्वयंपाक खोलीतील व्यस्तता, पूर्णवेळ पुरुषांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी राबत असलेली स्त्री, LGBTIQA या समूहाचे

जीवन व संघर्ष इत्यादीबाबत क्रमवार सर्वच चित्रपटांवरची निरीक्षणे उपस्थित वक्ते व मान्यवरांनी व्यक्त केले. चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या, मा. बी. ए. मेहरे यांनी केले. तसेच या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. इंग्रजी विभाग प्रमुख मा. डॉ. शैलेश बहादुरे यांनी महोत्सवाच्या आयोजन व यशस्वितेसाठी महत्वपूर्ण कार्य केले.

सामाजिक शास्त्राचे सर्व प्राध्यापक सहकारी मित्र उपस्थित होते. राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. विद्या चौरपगार यांनी चित्रपट महोत्सवाबाबतची भूमिका स्पष्ट केली. प्रा. अंकित बऱ्हाणपूरकर यांनी समारोपीय सत्राची जबाबदारी घेऊन उपस्थितांचे आभार मानले. या महोत्सवासाठी सामाजीक शास्त्रे, विज्ञान व वाणिज्य विभागातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते तसेच महाविद्यालयाच्या बाहेरील इतर विद्यार्थी, अभ्यासक व नागरिक उपस्थित होते.




'SAMABHAV FILM FESTIVAL' was jointly organized by Department of Political Science and Department of English on 22nd February 2024. The main objective of the event was gender sesitisation among youths in educational institutions. The event was supported by Men Against Violence and Abuse (MAVA) an NGO in Mumbai. Mr. Pravin Thote, volunteer of MAVA had interactive sessions on different themes picked out of the movies shown to students, that is Juice, Sunday and Little Goddess, Natkhat, The Great Indian Kitchen. Dr. Mrs. B. A. Mehere, Principal inaugurated the programme. Ms. Vidya Chaurpagar, Dr. Shailesh Bahadure coordinated the programme along with Mr. Manoj Andraskar, Mr. Ankit Banpurkar, Mr. Dilip Rathod, Ms. Swati Deokar, Ms. Rohini Meshram and student representatives.


DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHABHOOMI, NAGPUR










GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
43H9+88R, Vasant Nagar, Nagpur, Maharashtra 440010, India
Lat 21.128486°
Long 79.068213°
22/02/24 11:29 AM GMT +05:30
Google


DR. AMBEDKAR COLLEGE
DEEKSHABHOOMI
NAGPUR
GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
43H9+J56, Nagpur, Maharashtra 440010, India
Lat 21.129131°
Long 79.067622°
22/02/24 11:21 AM GMT +05:30
Google